!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# मुंबईच्या धर्तीवर सिडको मधील धार्मिक स्थळे नियमित होणार

## खासदार चंद्रकांत खैरे यांच्या प्रयत्नांना यश

## लिज होल्ड चे फ्री होल्ड करण्यासाठी वरीष्ठपातळीवर चर्चेला सुरुवात- केंद्रेकर

संभाजीनगर दि.१२- मुंबईच्या धर्तीवर सिडकोच्या विक्री योग्य भुखंडावरचे पाचशे चौ.मी. पर्यंतची धार्मिक स्थळे रेडीरेकनरच्या वीस टक्के रक्कम भरुन नियमित करण्यात यावी यासाठीची पॉलीसी तयार करुन सिडकोकडे पाठविली असल्याची माहिती आज शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी सिडकोच्या समस्यांबद्दल मुख्य प्रशासक सुनिल केंद्रेकर यांच्या दालनात घेतलेल्या बैठकीत स्पष्ट केले. लिज होल्डचे फ्री होल्ड करण्याच्या संदर्भात ही वरीष्ठ पातळीवर चर्चा सुरु असल्याची माहितीही त्यांनी दिली.

धार्मिक स्थळे वाचविण्यासाठी व सिडको वासियांच्या समस्या सोडविण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. सद्या सिडको कोणतीही धार्मिक स्थळे पाडण्याची कारवाई करणार नसुन ओपन स्पेस वरील धार्मिक स्थळे वाचविण्यासाठी मंत्रालय स्तरावर निर्णय करणे अपेक्षित असल्याचे सुनिल केंद्रेकर यांनी स्पष्ट केले. सिडकोच्या समस्यांबाबत खासदार चंद्रकांत खैरे यांनी आज १० प्रमुख मागण्यांचे पत्र सुनिल केंद्रेकर यांना दिले. यावेळी अनिल पोलकर, विश्वनाथ स्वामी, राजु खरे, किशोर नागरे, विरभद्र गादगे, आशुतोष डंख, साहेबराव घोडके, चंद्रकांत जीभकाटे, गणपत खरात, संदेश कवडे, नारायण सुरे, योगेश दळवी, गौतम चोपडा, गणेश नवले, सिडकोच्या प्रशासक विद्या मुंडे, श्री गोळखंडे, राजेश कुटे, यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

८ मे २०१४, १४ जानेवारी २०१५, २१ नोव्हेंबर २०१५ या तीन बैठकात झालेल्या चर्चेनुसार बांधकाम नंतर लीज डीड करुन देण्याच्या नियमामुळे ग्राहकांना अडचणी येत होत्या. लीज डीड नसल्यामुळे बँकेचे कर्ज मिळत नव्हते, जागा विकत घेण्यातच पैसे गेल्यानंतर बांधकाम कसे करायचे हा प्रश्न भेडसावत होता. हा प्लॉट दुसऱ्यांना विकताही येत नव्हता त्यामुळे या जटील प्रश्नावर सुनिल केंद्रेकर यांनी सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालक यांना प्रस्ताव सादर करुन पाठपुरावा करुन प्रश्न मार्गी लावण्यात आपण यश मिळविले त्यामुळे मालमत्ता हस्तांतरणाची समस्या मार्गी लागली व नागरीकांना मोठा दिलासा मिळाला त्यामुळे आता बांधकाम परवानगी घेताना स्थळ पाहणीची अट शिथील झाली. त्याबद्दल खासदार चंद्रकांत खैरे यांनी मुख्य प्रशासक सुनिल केंद्रेकर यांचे सिडको वासियांच्या वतीने आभार मानले.

सिडको हडको वाळुज महानगर येथील अस्थित्वात असलेली धार्मिक स्थळे मंदिरे लोकभावनांचा विचार करुन विक्री योग्य मालमत्ता त्याचप्रमाणे ओपन स्पेस जागेवरील १० टक्के जागा देऊन धार्मिक स्थळे नाममात्र मुल्य आकारुन नियमित करण्यात यावे. शॉपलेट व टपरी भूखंडाचे बांधकाम परवानगी व हस्तांतरणासाठी ठेवण्यात आलेली स्थळ पाहणी रद्द करुन हस्तांतरण सुलभ करुन अतिरिक्त भाडेपट्टा आकारात असल्यामुळे लेट प्लॅन सबमिशनची आकरण्यात येत असलेले पाच हजार रु. रद्द करण्यात यावे. तसेच टपरी, बेघर, भूखंड, भाजीवट्टे यांचे बाकी राहिलेले हप्ते माफक व्याज आकारुन भरुन घेण्यात येवून त्यांना नियमित करण्यात यावे. व सिडको परिसरातील मालमत्तांना २ एफ. एस. आय. लागु करण्यात यावा. अशी मागणी निवेदनाव्दारे करण्यात आली त्यावर सुनिल केंद्रेकर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. वाळुज महानगर प्रकल्पात ज्या शेतकऱ्याच्या १०० टक्के जमिनी बाधित आहे किंवा सिडकोने संपादित केल्या आहेत. त्यांना पर्यायी जमीनी/जागा देण्यात याव्यात. याविषयी वरिष्ठ पातळीवर चर्चा झाली असुन, एमआयडीसीला सिडकोची ३००० हेक्टर जागा देण्यात येणार असुन एमआयडीसीकडे हस्तांतरण झाल्यानंतर या समस्या मार्गी लागतील अशी माहिती सुनिल केंद्रेकर यांनी दिली. वाळुज प्रकल्पातील शेतकऱ्याकडील ७५ टक्के मालकीच्या जमीनीपैकी मंजुर लेआऊट मध्ये दोन पेक्षा अधिकचे भूखंड एकत्रिकरण करण्याची परवानगी देण्यात यावी. वाळुज प्रकल्पातील ज्या शेतकऱ्यांना जमिन संपादन मोबदल्यात टी. डी. आर. हवा आहे त्यांना टी. डी. आर. मंजुर करण्यात यावा. वाळुज प्रकल्पात ना शहरी भागातील अनाधिकृत वसाहतीच्या जागा रेसीडेन्शीयल झोनमध्ये समाविष्ट करुन बांधकाम नियमित करण्यात यावे. अशा मागण्या खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकीत मांडल्या. यावर मुख्य प्रशासक सुनिल केंद्रेकर यांनी सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांशी चर्चा करुन सकारात्मक निर्णय घेऊ असे आश्वासन दिले.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन / गणेश वाघ.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com yp4329@gmail.com 8421415255/7769052525